सं.फौ.ख.क्र.५१७५/२०१७
सरकार वि. संकेत
नि.क्र.५६ पुढे
CNR No.MHCH030074942017

**-न्या य नि र्ण य-**

(घोषित दिनांक १४/०८/२०२६)

१. आरोपींविरूध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५ (अ), ८३ अन्वये खटला चालविण्यात आला.

२. प्रस्तुत प्रकरणात पोलीस स्टेशन घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर यांनी गुन्हा क्र.६४०/२०१७ हा नोंदविला. तपासादरम्यान तपास अधिकारी यांनी साक्षीदारांचे बयाण नोंदविले व आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले.

३. आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९, कलम ६५(अ), ८३ अन्वये गुन्हयाचा तपशील **(निशाणी क्र.५६ पुढे)** नोंदविला. आरोपींनी प्रतिकथन नाकारल्यामुळे त्यांच्याविरुद्ध खटला चालविण्यात आला. आरोपींविरुध्द पुरावा मिळून न आल्याने आरोपींचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५१ अन्वयेचे बयाण नोंदविण्यात आले नाही.

४. अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेल्या पुराव्याचा विचार करता माझ्या मते खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थीत होतात. सदरील प्रत्येक मुद्दयाचा निष्कर्ष मी कारणासहीत अनुमान काढुन नोंदवलेला आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने सिध्द केले काय की, दिनांक २८.१०.२०१७ रोजी ०५:५० ते ०६:५० च्या सुमारास एस.एस.टी. पॉइंट, नकोडा, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर येथे आरोपींनी संगणमत करून १६०० नग प्रत्येकी ९० मि.ली. रॉकेट संत्रा देशी दारुच्या प्लॅस्टीक बाटल्या | **...नाही** |

| | | |
|---|---|---|
| | आरोपी हे विना परवाना व अवैधरीत्या बाळगतांना व वाहतुक करतांना आढळून आले व त्या परिणामी त्यांनी महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(अ), ८३ प्रमाणे गुन्हा केला ? | |
| २. | काय आदेश ? | **...आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**५.** आरोपींविरुध्द ठेवलेला आरोप सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षातर्फे एका साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आली आहे. अभियोगपक्षाला पुरेशी संधी देऊन सुद्धा अभियोगपक्ष उर्वरीत साक्षीदारांना हजर करु शकले नाही. त्यामुळे अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**<u>मुद्दा क्र.१ करीता</u>** :-

**६.** अभियोगपक्षातर्फे घटनास्थळ पंचनामा सिध्द करण्यासाठी पंच साक्षीदार क्र.१ किशोर मधुकर साधनकर यांना तपासले. सदर साक्षीदाराच्या पुराव्यात असे आले आहे की, ते आरोपींना ओळखत नाही. त्यांच्या समक्ष आरोपींकडुन पोलिसांनी काहीही जप्त केले नव्हते व कोणतीही कारवाई केली नव्हती. पोलिसांनी त्यांच्या काही कागदांवर सह्या घेतल्या होत्या. त्यांना सुचनापत्र, घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा दाखविला असता त्यावरील त्यांच्या सह्या त्यांनी ओळखल्या परंतु त्यातील मजकुर त्यांना माहिती नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य केले नाही. त्यामुळे विशेष सहाय्यक सरकारी वकील यांनी न्यायालयाच्या परवानगीने त्यांची उलटतपासणी घेतली, परंतु अभियोगपक्षाला मदत होईल असा कुठलाही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्याचप्रमाणे अभियोगपक्षास पुष्टी देणारी कथने साक्षीदारांनी नाकारली.

**७.** साक्षीदार क्र.१ यांनी त्यांच्या समक्ष कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे मान्य केले. त्यामुळे तथाकथीत दारु आरोपींच्या ताब्यातून जप्त करण्यात आली व

आरोपी हे दारु वाहतुक करतांना मिळून आले, याबाबतचा कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर उपलब्ध झाला नाही. तसेच असे दिसते की, अभियोगपक्षाने अभिलेखावर सी.ए. अहवाल दाखल केलेला आहे. परंतु सदर सी.ए. अहवाल सिद्ध करण्यास अभियोगपक्ष अपयशी ठरलेला आहे. करीता सदर अहवाल आरोपींकडून जप्त केलेल्या मुद्देमालाचाच होता काय, हे स्पष्ट होऊ शकले नाही. सदर खटल्यात फिर्यादी, तपासी अधिकारी तसेच इतर स्वतंत्र साक्षीदारांची तसेच मुद्देमाल वाहून घेवून जाणाऱ्या वाहकाची साक्ष न नोंदविल्यामूळे जप्त केलेला मुद्देमाल देशी दारु होती किंवा कसे ही बाब सिध्द होण्याइतपत सबळ पुरावा न्यायालयासमोर आला नाही. म्हणून आरोपींविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (अ), ८३ अन्वये गुन्हा केल्याचे निर्वीवाद सिद्ध झाले असे म्हणता येणार नाही. अशा परिस्थीतीत आरोपींविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (अ), ८३ हे निर्वीवाद सिध्द होत नाही. म्हणून मुद्दा क्रमांक ०१ चे निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.२ करीता :–**

८. मुद्दा क्र.१ च्या नकारार्थी निष्कर्षास अनुसरुन आरोपी हे निर्दोष सुटण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दा क्र.२ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

| **आदेश** | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१ **संकेत हिरामण निमगडे**, आरोपी क्र.२ **महेंद्र संजय गावडे**, आरोपी क्र.३ **चंद्रशेखर चंद्रभान मडावी**, आरोपी क्र.४ **आकाश रामदास पाचपोर**, आरोपी क्र.५ **अतिश दिलीप कोंडबत्तुलवार**, आरोपी क्र.६ **समीर नागेन सेन**, आरोपी क्र.७ **संदेश हिरामण निमगडे** यांची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(अ), ८३ च्या अपराधातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | आरोपींचे जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येतात. |

| | |
|---|---|
| ३. | जप्त मुद्देमाल १६०० नग प्रत्येकी ९० मि.ली. रॉकेट संत्रा देशी दारूच्या बाटल्या आवाहनाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर नियमानुसार विल्हेवाट लावण्याकरीता निरीक्षक, राज्य उत्पादक शुल्क यांच्याकडे पाठविण्यात यावी. |
| ४. | सदर खटल्यात जप्त मुद्देमालापैकी दारू वाहुन नेण्याकरीता वापरलेले काळ्या रंगाचे वाहन BAJAJ AVENGER–150 क्र. एम.एच.३४ ए.झेड.२६१५, लाल रंगाचे वाहन BAJAJ PULSAR–150 क्र. एम.एच.३४ टी.सी.१३३, निळ्या काळ्या रंगाचे वाहन BAJAJ PULSAR–220 क्र. एम.एच.३४ ए.एक्स.४०८४, INTRX कंपनीचा काळ्या रंगाचा मोबाईल तसेच सॅमसंग कंपनीचा पांढऱ्या रंगाचा मोबाईल या गाड्या व मोबाईल सुप्रतनाम्यावर परत केले असल्यास तो सुप्रतनामा कायम करण्यात यावा. |
| ५. | दारू वाहुन नेण्याकरीता वापरलेल्या चार नायलॉन चुंगड्या या मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नाश करण्यात याव्या. |
| ६. | आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ अन्वये प्रत्येकी रु.७,५००/– चे जामीन व बंधपत्र दयावे. |
| **(न्यायनिर्णय हा खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)** | |

sd/–

दिनांक : १४/०८/२०२६
स्थळ : चंद्रपूर

**(पी. जी. खरात)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
(न्यायालय क्र.६), चंद्रपूर